**जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत प्राप्त होणाऱ्या निधीमधुन नविन अंगणवाडी बांधकाम करणे, ज्या जुन्या अंगणवाडयांमध्ये शौचालये नाहीत त्याठिकाणी शौचालयाची बांधकामे करणे तसेच अंगणवाडी इमारतींची किरकोळ दुरुस्तीची कामे करण्यास मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०१७/प्र.क्र.१०१/का.६**
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १५ डिसेंबर, २०१७

वाचा :- (१) नियोजन विभाग,शा.नि. क्र.जिवायो-१००७/प्र.क्र.३९/का-१४४४, दि.१६ फेब्रुवारी २००८
(२) महिला व बाल विकास विभाग,शा.नि.एबावि-२००८/प्र.क्र.१७३/का-६, दि. १५ जानेवारी २०१०
(३) महिला व बाल विकास विभाग,शा.नि.एबावि-२००८/प्र.क्र.१७३ (भाग-१)/का-६, दि. २० एप्रिल २०११
(४) महिला व बाल विकास विभाग,शा.नि.एबावि-२०१३/प्र.क्र.१५८/का-६, दि.२९ जानेवारी २०१४
(५) नियोजन विभाग ,पत्र क्रमांक डिएपी-१०१७/प्र.क्र.११२/का.१४८१, दि. १ जुलै २०१७

**प्रस्तावना:-** महिला व बाल विकास विभागामार्फत महिलांच्या व बालकांच्या विकासाच्या विविध योजना राबविण्यात येतात. ० ते ६ वयोगटातील मुलांच्या विकासाकडे लक्ष देण्यासाठी एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई या कार्यालयाकडून राबविण्यात येत आहे. महिला व बाल विकास विभागामार्फत राज्यात अंगणवाडया चालविण्यात येतात. अंगणवाडयांच्या इमारती बांधण्यासाठी दिनांक १५ जानेवारी २०१० च्या शासन निर्णयानुसार आराखडा निश्चित करण्यात आला असून बिगर आदिवासी क्षेत्रासाठी एका अंगणवाडी बांधकामासाठी रुपये ६.०० लाख व आदिवासी क्षेत्रासाठी रुपये ६.६० लाख इतका निधी मंजूर करण्यात येतो.

२. शासनाच्या विविध योजनांतर्गत अंगणवाडी बांधकामासाठी निधी उपलब्ध होत असून त्यामध्ये प्रामुख्याने जिल्हा वार्षिक योजना, १३ वा वित्त आयोग, नाबार्ड, अल्पसंख्याक विभाग, मानव विकास मिशन, आदिवासी उपयोजना तसेच मनरेगा अंतर्गत निधी प्राप्त होत असतो. अंगणवाडी इमारत बांधकाम करण्यासाठी ग्रामपंचायतीकडून मोफत जागा उपलब्ध होणे आवश्यक आहे. अंगणवाडी बांधकामासाठी निधी मंजूर केल्यानंतर सदर आर्थिक वर्षात जागा उपलब्ध न झाल्यास, तसेच पाण्याचा दुष्काळ असल्यास विहित कालावधीत इमारतीचे बांधकाम पुर्ण करुन घेणे जिल्हा परिषदेस शक्य होत नाही. परिणामत: मोठया प्रमाणावर निधी अखर्चित राहिलेला आहे.

३. जिल्हा वार्षिक योजनेमधुन दरवर्षी अंगणवाडी बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. अंगणवाडी बांधकामासाठी यापुर्वी राज्यस्तरावर लेखाशिर्ष उपलब्ध नसल्यामुळे निधी अर्थसंकल्पित करण्यास अडचणी येत होत्या. सन २०१७-१८ पासून अंगणवाडी बांधकामासाठी नविन लेखाशिर्ष राज्यस्तरावर ४२३६००६७ मंजूर करुन घेण्यात आलेले आहे. तसेच केंद्र शासनाकडून बांधकामासाठी निधी प्राप्त झाल्यानंतर निधी अर्थसंकल्पित करण्यासाठी ६०:४० प्रमाणे नविन लेखाशिर्ष केंद्र ४२३६००४९

व राज्य ४२३६००५८ मंजूर करुन घेण्यात आलेली आहेत. तसेच सदर लेखाशिर्षाखाली निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे.

४. सन २०१७-१८ पासून जिल्हा वार्षिक योजनेमधुन अंगणवाडी बांधकामासाठी अर्थसंकल्पित केलेला निधी हा नविन अंगणवाडी बांधकामाबरोबरच ज्या जुन्या अंगणवाडयांमध्ये शौचालये नाहीत अशा ठिकाणी शौचालयाचे बांधकाम करणे तसेच अंगणवाडी इमारतीची किरकोळ दुरुस्तीची कामे करणे यासाठी खर्च करण्याची बाब विचाराधीन होती. जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत सन २०१७-१८ मध्ये अंगणवाडी बांधकामासाठी अर्थसंकल्पित केलेला निधी जिल्हापरिषदांना वितरीत न करण्याबाबतच्या सूचना सर्व जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव तसेच सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) यांना नियोजन विभागाने संदर्भाधिन दिनांक १ जुलै २०१७ च्या पत्रान्वये दिलेल्या आहेत. जिल्हा वार्षिक योजनेमधुन नविन अंगणवाडी बांधकाम करणे, जुन्या अंगणवाडयांमध्ये शौचालय नसलेल्या ठिकाणी शौचालयांची बांधकामे करणे व अंगणवाडी इमारतीची किरकोळ दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** सन २०१७-१८ पासून जिल्हा वार्षिक योजनेमधुन नविन अंगणवाडी बांधकाम करणे, ज्या अंगणवाडयांमध्ये शौचालये नाहीत त्या ठिकाणी शौचालये बांधणे व अंगणवाडी इमारतींची किरकोळ दुरुस्तीची कामे करण्यास शासन मान्यता देत आहे. जिल्हा वार्षिक योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या अंगणवाडी बांधकाम योजनेच्या नावात बदल करुन "**नविन अंगणवाडी बांधकाम, अंगणवाडी शौचालय बांधकाम व** अंगणवा**डी इमारतीची** किरकोळ **दुरुस्ती"** अशी सुधारणा करण्यास शासन मान्यता देत आहे. त्याचप्रमाणे या शासन निर्णयाद्वारे सदर योजनेस प्रशासकीय विभाग म्हणून तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. यापुढे जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत नविन अंगणवाडी बांधकाम, अंगणवाडी शौचालय बांधकाम व अंगणवाडी इमारतीची किरकोळ दुरुस्ती या योजनेतंर्गत निधी अर्थसंकल्पित करण्यात यावा.

२. सन २०१७-१८ पासून जिल्हा वार्षिक योजनेमधुन नविन अंगणवाडी बांधकाम, अंगणवाडी शौचालय बांधकाम व अंगणवाडी इमारतींची किरकोळ दुरुस्ती योजनेसाठी अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या निधीच्या खर्चाचे प्रमाण नविन अंगणवाडी बांधकामासाठी ५०% व जुन्या अंगणवाडी इमारतींची किरकोळ दुरुस्ती करणे तसेच ज्या अंगणवाडी मध्ये शौचालये नाहीत त्याठिकाणी शौचालये बांधकाम करणे यासाठी ५०% असे राहील त्याप्रमाणे निधी खर्च करण्यात यावा.

३. सन २०१७-१८ पासून अंगणवाडी बांधकामासाठी जिल्हा वार्षिक योजनेमधुन अर्थसंकल्पित केलेला निधी नविन अंगणवाडी बांधकामासाठी ५०% व जुन्या अंगणवाडीमध्ये किरकोळ दुरुस्तीसाठी तसेच ज्या अंगणवाडी मध्ये शौचालये नाहीत त्याठिकाणी शौचालये बांधण्यासाठी ५०% याप्रमाणे निधी खर्च करण्यात यावा. सर्व महिला व बाल विकास अधिकारी (जिल्हा परिषद) यांनी त्यांच्या जिल्हयातील अंगणवाडयांचा आढावा घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा पारिषद) यांच्या मान्यतेने अंगणवाडी बांधकामासाठी अर्थसंकल्पित केलेल्या निधीमधुन ५०% प्रमाणे कामांची विभागणी करुन घेण्यात येणाऱ्या कामाचा आराखडा तयार करुन जिल्हाधिकारी यांच्याकडून निधी उपलब्ध करुन घेण्यात यावा. वित्तीय वर्ष संपण्याचा कालावधी विचारात घेऊन तातडीने कामाचे नियोजन करण्यात यावे.

४. ज्या अंगणवाडयांमध्ये शौचालये नाहीत अशा ठिकाणी शौचालयाची बांधकामे प्राथम्याने हाती घेण्यात यावीत. तसेच अंगणवाडी इमारतीमधील किरकोळ दुरुस्तीची कामे ( उदा.कडी कुलुप दुरुस्ती/

खिडक्या दुरुस्ती/स्लॅब दुरुस्ती/ फरशी दुरुस्ती /टॉयलेटवर पाण्याची टाकी बसविणे/ नळ दुरुस्ती/ वॉश- बेसीन बसविणे इत्यादी ) यासारख्या अन्य किरकोळ दुरुस्तीवर निधी खर्च करण्यास शासन मान्यता देत आहे. सदर कामे खालील अटींच्या अधीन राहुन मंजूर करण्यात यावीत.

१) शासनाच्या मालकीच्या अंगणवाडयांमध्येच शौचालयाची बांधकामे करणे तसेच अंगणवाडी इमारतींची किरकोळ दुरुस्तीची कामे हाती घेण्यात यावीत.

२) जिल्हा वार्षिक योजेनेच्या निधीमधून यापूर्वी मंजूर करण्यात आलेले अंगणवाडी इमारत बांधकाम अपूर्ण असेल आणि अशा मंजूर रक्कमेपैकी काही रक्कम अंमलबजावणी यंत्रणांना वितरीत केली नसेल अशास्थितीत मंजूर रक्कमेपैकी वितरीत करावयाची उर्वरित रक्कम अपुर्ण बांधकाम पूर्ण करण्यासाठी या निधीमधून देता येऊ शकेल. कोणत्याही परिस्थितीत संबधित अंगणवाडी केंद्राचे बांधकामासाठी बिगर आदिवासी क्षेत्रासाठी रुपये ६.०० लाख व आदिवासी क्षेत्रासाठी रुपये ६.६० लाख अनुज्ञेय असलेल्या निधीपेक्षा जास्तीची रक्कम देण्यात येऊ नये. अपूर्ण बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन दिल्यानंतर निधी शिल्लक रहात असल्यास नविन अंगणवाडी बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात यावा.

३) अंगणवाडीमध्ये नविन शौचालय बांधकाम करणे तसेच पुर्वीचे शौचालय पूर्णपणे पडून गेलेले असून दुरुस्तीयोग्य नाही अथवा वापरण्यायोग्य नाही अशा शौचालयाचे जागेवर पूर्णपणे नविन शौचालय बांधता येऊ शकेल जेणे करुन ती जागा उपयोगात येईल अथवा नवीन जागेतही शौचालय बांधता येऊ शकेल. शौचालय बांधतेवेळी त्यावर पाण्याची टाकीही असावी,त्यासाठी नळ योजनेचे पाणी पुरवठयाची व्यवस्था ग्रामपंचायतीने करावी.मुलांना हात धुण्यासाठी वॉश बेसिनची व्यवस्था सुध्दा असावी.

४) शौचालय बांधकामासाठी (पाण्याच्या टाकी बसविणे,नळ फिटिंग व वॉश बेसिनसह) एकुण कमाल खर्चाची मर्यादा रुपये ४०,०००/- असावी. तसेच अंगणवाडी इमारतीची किरकोळ दुरुस्ती करणे यावर रुपये १.०० लाख इतक्या कमाल मर्यादेपर्यंतच खर्च करण्यात यावा. याबाबतचे खर्चाचे अंदाजपत्रक जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडून तयार करुन घेण्यात यावे.

५) जिल्हा वार्षिक योजनेमधुन नविन अंगणवाडयांचे बांधकाम करणे, जुन्या अंगणवाडयांच्या ठिकाणी शौचालयाच्या बांधकामास मंजूरी देणे तसेच अंगणवाडी इमारतींची किरकोळ दुरुस्तीची कामे मंजूर करणे यासाठी खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत असून सदर समितीच्या मान्यतेने कामे हाती घेण्यात यावीत.मंजूर करण्यात आलेली कामे जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडून विहित कार्यपध्दतीचे पालन वापर करुन करण्यात यावीत.

| | | |
|---|---|---|
| १) | मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) - | अध्यक्ष |
| २) | कार्यकारी अभियंता, (बांधकाम विभाग) (जिल्हा परिषद) - | सदस्य |
| ३) | महिला व बाल विकास अधिकारी (जिल्हा परिषद) | सदस्य सचिव |

हा शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौ.सं.क्र. २०५/१७/ व्यय ६, दिनांक १३.१०.२०१७ अन्वये मिळालेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१२१३११४१२५४८३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Lalsing
Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2017.12.15 16:08:37 +05'30'

(ला.रा.गुजर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री / राज्यमंत्री, महिला व बाल विकास , मंत्रालय, मुंबई
४) सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री ,मंत्रालय,मुंबई
५) मा.विरोधी पक्ष नेता, विधान सभा/विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे स्वीय सहाय्य
७) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
८) प्रधान सचिव ( नियोजन विभाग) मंत्रालय,मुंबई
९) प्रधान सचिव (ले.व को),वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
१०) सचिव (महिला व बाल कल्याण विभाग), मंत्रालय, मुंबई
११) सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई
१३) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे
१४) सर्व विभागीय आयुक्त
१५) सर्व जिल्हाधिकारी
१६) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१७) सर्व महानगरपालिका आयुक्त, महानगरपालिका
१८))महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखापरिक्षा), महाराष्ट्र मुंबई / नागपूर
१९) सर्व विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास
२०) सर्व महिला व बाल विकास अधिकारी (जिल्हा परिषदा)
२१) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी/ग्रामीण/आदिवासी)
२२) सर्व मुख्य अधिकारी, नगरपालिका,
२३) सर्व मंत्रालयीन विभाग
२४) वित्त विभाग (व्यय-६)/नियोजन विभाग ( का.१४७२) मंत्रालय,मुंबई
२५) सर्व कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग ( जिल्हा परिषद)
२६) महासंचालक, राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन, औरंगाबाद
२७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२८) निवासी लेखा परिक्षा अधिकारी मुंबई
२९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
३०) महिला व बाल विकास विभागातील सर्व कार्यासने
३१) निवड नस्ती (कार्यासन ६)